# Positive Stories Of Nagpur Rural Police

## दिनांक -३०/०८/२०१६ (मंगळवार)

### पोलीस स्टेशन खापरखेडा व स्थानिक गुन्हे शाखेची संयुक्त कार्यवाही
### सराईत गुन्हेगार लतीफ अन्सारीला केली अटक.

पो.स्टे.खापरखेडा अपराध क्र. २३८/२०१६ कलम ३७९, १०९, ३४ भादंवी व पोलीस स्टेशन आणि पोलीस स्टेशन कोराडी, नागपूर शहर येथील अपराध क्र. ११४ / २०१६ कलम ३७९, १०९, ३४ भादंवी, व मोक्का मधील फरार आरोपी नामे - मोहम्मद लतीफ मोहम्मद हफीज अन्सारी, वय ४० वर्षे, रा. वलनी खदान, ता. सावनेर, जि. नागपुर हा गेल्या १ महीन्यापासुन फरार असुन लतीफ अन्सारीचा शोध घेणेबाबतचे प्रयत्न युध्द पातळीवर नागपुर (ग्रामीण) पोलीस आणि नागपुर शहर पोलीसांकडुन चालु होते. परंतु त्याचा थांगपत्ता मिळत नव्हता. आरोपी लतीफ अन्सारी वर अनेक रेतीचोरीचे गुन्हे दाखल असुन आरोपी लतीफ वर वेळोवेळी प्रतिबंधात्मक कारवाई करण्यात आलेल्या आहेत. लतीफच्या या गुन्हेगारी वृत्तीला आळा घालण्याकरीता मोक्का सुध्दा लावण्यात आलेला आहे. आरोपी लतीफवर मोक्काच्या केसेस लावल्या आहेत. हे त्याला माहित झाल्यापासुन फरार होता.

आज दिनांक ०४/०८/२०१६ रोजी नागपुर (ग्रामीण) जिल्हयाचे पोलीस अधीक्षक श्री. अनंत रोकडे यांचे मार्गदर्शनाखाली व स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक संजय पुरंदरे, व पोलीस स्टेशन खापरखेडाचे पोलीस निरीक्षक महेश चाटे यांनी माहीती दिल्यावरून सध्या पोलीस स्टेशन खापरखेडाचे प्रमुख स.पो.नि. श्रीमती. अनामिका मिर्झापुरे, स.पो.नि. नितीनचंद्र राजकुमार, पो.उपनि. जितेश कानपुरे, ना.पो.शि. कैलाश इंगोले, पो.शि. विवेक चुटे, म.पो.शि. प्रिती, चालक कनौजिया ,ना.पो.शि. बंडु कोकाटे यार्चेसह स्थानिक गुन्हे शाखेचे पो.हवा. शशी शेन्डे, ना.पो.शि. सुंनिल मिश्रा यांना गोपनीय माहीती मिळताच अवघ्या १४ मिनटाच्या आत आरोपी लतीफ अन्सारी याच्या घराजवळ पोहचले असता आरोपी लतीफ अन्सारी हा पोलीसांना पाहुन पळु लागला. तेव्हा तात्काळ स.पो.नि. राजकुमार व त्यांच्या पथकाने सापळा रचुन आरोपी लतीफचा पाठलाग करून अतिशय नाटयमयरीत्या आरोपी लतीफ अन्सारी यांस पकडण्यात आले. वर नमुद पोलीस स्टेशन खापरखेडा येथील गुन्हयात त्याला अटक करण्यात आली असुन नागपुर (ग्रामीण) पोलीसांना आरोपी लतीफ अन्सारी सारख्या आरोपीच्या मुसक्या आवळण्यात यश आले आहे.



अटक आरोपी  लतीफ अन्सारी यांचेसह पो.स्टे. खापरखेडा येथील पोलीस अधिकारी व कर्मचारी

## घरून निघुन गेलेल्या मुलीला अवघ्या २४ तासांच्या आत शोधण्यात आले खापरखेडा पोलीसांना यश.

दिनांक २४/०८/२०१६ चे १३.०० वा. दरम्यान कुणीतरी अज्ञात इसमाने माझी मुलगी पळवून नेली –अशी तक्रार महिला फिर्यादी हीने पोलीस स्टेशन खापरखेडा येथे दिनांक २६/०८/२०१६ चे १५.२४ वा दिली.अशा तक्रारीवरून पो.स्टे. खापरखेडा येथे अप.क्र. ३७२/१६ कलम ३६३ भांदवी नोंद करून तपासात घेण्यात आला. सदर गुन्हयातील अपहृत मुलगी ही अवघ्या १७ वर्षाची असल्याने तिचा तात्काळ शोध लावणे हे पोलीसांसाठी आव्हान होते. पोनि. चाटे ,पो.स्टे. खापरखेडा यांनी अपहृत मुलीचा शोध लावण्याबाबत मार्गदर्शन करून तपासाची सुत्रे महिला पोलीस अधिकारी सपोनी मिर्झापुरे यांच्या हाती दिले.

महिला पोलीस अधिकारी अनामिका मिर्झापुरे यांनी सदर घटनेस प्रथम प्राधान्य देवून तक्रारकर्त्या महिलेस विचारपूस केली.तिचे राहते घरी भेट देवून आजुबाजूचे अपहृत मुलीशिवाय कुणी गायब नसल्याची खात्री केली.त्यानंतर अपहृत मुलीचे मित्राच्या चौकशी दरम्यान अपहृत मुलीचा मोबाईल क्र.ट्रेस करण्यास सायबर सेल टिमला देण्यात आला तसेच मुलीच्या शोध घेण्यासाठी आजुबाजूचे बस स्टॅाप ,रेल्वे स्टेशन ,लॉज , मंदीर , इत्यादी ठिकाणी चेक करण्यात आले.

आज दिनांक २७/०८/२०१६ रोजी अपहृत मुलीचे मोबाईलचे टॉवर लोकेशन मिळाल्यावरून सपोनि अनामिका मिर्झापूरे ,स्टॉफसह रामटेक येथे पोहचल्या. रामटेक येथील मंदीर , आश्रमशाळा चेक करतांना रामेश्वर मंदीर जवळ असणारे हनुमान मंदीर ,रामटेक येथे अपहृत मुलगी बसलेली दिसली. तेव्हा तपासादरम्यान असे लक्षात आले की, अपहृत मुलगी हीला नेहमीच वेगवेगळ्या प्रकारचे भ्रम होत असून यापूर्वी सुध्दा ती कुणालाही न सांगता घराचे बाहेर निघून गेलेली आहे. दिनांक २४/०८/२०१६ रोजी सुध्दा तिला असाच भ्रम झाला व ती त्या भ्रमातच रामटेक मंदीर येथे निघून गेली होती. अपहृत मुलीस विचारपूस करून तिला तिचे आई-वडीलांचे ताब्यात देण्यात आले.

केवळ १७ वर्षाची मुलगी हीचे जिवीतांस काही धोका निर्माण होवू नये .तिचे सोबत कुठलेही वाईट कृत्य होवू नये याकरीता धडपडीने अवघ्या २४ तासांचे आत अपहृत मुलीचा शोध खापरखेडा पोलीसांनी घेवून अप्रिय घटना घडण्यास अटकाव आणला. सदर अपहृत मुलीचा शोध लावण्यासाठी पोलीस निरीक्षक चाटे यांनी मार्गदर्शन केले तर महिला सपोनी मिर्झापूरे व नापोशि मेश्राम यांनी मिळून मुलीचा शोध घेतला.